कोल्हापूर जिल्हा परिषद
अर्थ समिती सभा क्रमांक ५ / २०२३-२४
प्रशासक कालावधी

वार - बुधवार
दिनांक ०२/०८/२०२३

वेळ - सकाळी ११.०० वाजता
स्थळ - कोल्हापूर

## -: कार्यवृत्तांत :-

जिल्हा परिषद कोल्हापूर कडील प्रशासक कालावधीतील सन २०२३-२४ या अर्थिक वर्षातील अर्थ समितीच मासिक सभा बुधवार दि. ०२/०८/२०२३ रोजी दु. ११.०० वाजता मा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.कोल्हापू यांचे दालनामध्ये येथे आयोजित करणेत आलेली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. श्री. संतोष पाटील | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक |
| २. श्री. वि.तु. पाटील | मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा सदस्य सचिव |
| ३. श्रीम अरुणा हसबे | उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ४. श्रीम दुर्गाली गायकवाड | लेखाधिकारी |
| ५. श्री. अनिकेत गावडे | लेखाधिकारी |

येणेप्रमाणे जि.प.मुख्यालयाकडील सर्व विभागांचे लेखा प्रतिनिधी उपस्थित झालेनंतर सभेच्या कामकाजास सुरवात करणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक यांनी सुचित केले.

**श्री. वि.तु.पाटील ,मुलेविअ -** आजच्या प्रशासक कालावधीतील वित्त समितीच्या बैठकीस उपस्थित असलेले मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक जि.प. कोल्हापूर तसेच वित्त विभाग व इतर विभागाकडील माझे सहकारी अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरवात करतो.

**विषय क्रमांक - १**

मागील सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे .

**ठराव क्रमांक - ९**

मागील सभेचा कार्यवृत्तांत वाचुन कायम करणेत यावा.

**विषय क्रमांक - २**

कोल्हापूर जिल्हा परिषदेची माहे जुन २०२३ ची जमा व खर्च पत्रके अवलोकन करुन अंतिम मंजूरीसाठी स्थायी समितीकडे शिफारस करणे .

**ठराव क्रमांक - १०**

कोल्हापूर जिल्हा परिषदेची माहे जुन २०२३ ची जमा व खर्च पत्रके अवलोकन करुन अंतिम मंजूरीसाठी स्थायी समितीकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक - ३**

वित्त विभागाकडील लेखा विषयक नोंदवहया माहे एप्रिल २०२३ ते जुन २०२३ अखेर पुर्ण अपुर्ण असलेबाबत अवलोकन करणे.

**ठराव क्रमांक - ११**

वित्त विभागाकडील लेखा विषयक नोंदवहयां माहे एप्रिल २०२३ ते जुन २०२३ अखेर पुर्ण अपुर्ण असलेबाबत अवलोकन करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ४**

मा. मुख्य कार्यकारी अधिकारीसो यांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयांवर चर्चा करणे.

मा.श्री.संतोष पाटील, मु.का.अ - शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीचे Moniterning करणेत यावे. राज्यशासनाकडे निधीबाबत मागणी नियमितपणे करावी. सर्व योजनांचा खर्च हा १००% होईल हे पहावे. कोणत्याही योजनेचा निधी हा निधी अखर्चित राहता कामा नये अथवा परत भरणेत येवू नये. सप्टेंबर २०२३ मध्ये जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा होणार आहे. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेपुढे योजनांची मंजूरी घेणेपुर्वी सर्व विभागांनी त्यांचेकडे असलेल्या योजनांमधील लाभार्थी निवड, तांत्रिक मंजुरी व प्रशासकीय मंजूरी घेणेची दक्षता घेणेत यावी. तसेच, सर्व विभागांनी संकलन शाखेसोबत योजना व योजनेत्तर च्या खर्चाचा ताळमेळ पढील होणाऱ्या समितीच्या बैठकीपूर्वी

श्री.वि.तु.पाटील, मुलेववि‍अ-  वरिलप्रमाणे नियोजन करून त्याप्रमाणे विभागाकडून कार्यवाही करून घेत आहे.

अन्य विषय व चर्चा नसलेने श्री.वि.तु.पाटील, मुलेववि‍अ यांनी पुढीलप्रमाणे आभार मानले.

आजच्या प्रशासन कालावधीतील वित्त समितीला उपस्थित असणारे मा. मुख्य कार्यकारी अधिकारीसो, सर्व विभागाकडील खाते प्रमुख, वित्त विभागाकडील उपमुलेवि‍अ, लेखाधिकारी व इतर खात्याकडील लेखा कर्मचारी यांनी आजच्या अर्थ समितीचे सभा कामकाज चालविणेसाठी दिलेल्या सहकार्याबददल मी सर्वांचे मन:पुर्वक आभार मानून मा. मुख्य कार्यकारी अधिकारीसो यांच्या मान्यतेने आजची सभा संपल्याचे जाहिर करतो.

दि. /०८/२०२३.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
तथा
सदस्य सचिव जि.प.कोल्हापूर

मुख्य कार्यकारी अधिकारी
तथा
प्रशासक, जि.प. कोल्हापूर